**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ | अंक २३९ | शुक्रवार १९ जून २०२६ | पाने ४ | मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## संघटित गुन्हेगारी प्रकरणातील दोन फरार आरोपी फिल्मी स्टाईलने जेरबंद

### तोफखाना पोलिसांची शेंडी बायपास परिसरात कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** तोफखाना पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गंभीर संघटित गुन्हेगारी प्रकरणातील दोन मुख्य फरार आरोपींना पोलिसांनी फिल्मी स्टाईलने पाठलाग करून अटक केली आहे. सोमनाथ भानुदास गिते आणि अशोक भानुदास गिते (दोन्ही रा. भगवानबाबा चौक, निर्मलनगर, अहिल्यानगर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. या प्रकरणातील इतर दोन आरोपींचा शोध सुरू आहे.

तोफखाना पोलीस ठाण्यात १४ एप्रिल २०२३ रोजी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांसह अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (अ‍ॅट्रॉसिटी) गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन ६ जून २०२६ रोजी यामध्ये संघटित गुन्हेगारीशी संबंधित भारतीय न्याय संहिता कलम १११ (संघटित गुन्हेगारी) हे वाढविण्यात आले होते. गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी फरार होते.

डॉ. दिलीप टिपरसे यांनी आरोपींचा शोध घेण्यासाठी तोफखाना पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला विशेष सूचना दिल्या होत्या. दरम्यान, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर यांना गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, हे आरोपी शेंडी बायपास परिसरात येणार आहेत.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी काल रात्री शेंडी बायपास येथे सापळा रचला. आरोपी दुचाकीवरून वेगात जात असताना पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर आणि त्यांच्या पथकाने अत्यंत शिताफीने, फिल्मी स्टाईलने पाठलाग करून त्यांना ताब्यात घेतले.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. दिलीप टिपरसे, पोसई योगेश चाहेर, पोलीस अंमलदार अरुण गांगुर्डे, दिनेश मोरे, शाकिर शेख, भागवत बांगर, राजू भालसिंग आणि किरण बनसोडे यांच्या पथकाने केली.

## ठाकरे शिवसेनेच्या गद्दार खासदारांनी आधी राजीनामे द्यावेत, मग शेण खावं

### किरण काळेंचा संतप्त इशारा । अहिल्यानगरात संताप उसळला, गाढवावरील प्रतिमांना जोडे मारत पायदळी तुडवले

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** 'शिवसेना' या चार अक्षरां मुळे खासदारांना जनतेने पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे पाहत निवडून दिल. तुम्ही मात्र फितूर झालात. गद्दार निघालात. पन्नास खोके, सत्ता यापुढे तुम्ही जनता, शिवसेनेशी बेईमान झालात. हिम्मत असेल तर शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खा. भाऊसाहेब वाकचौरे यांच्यासह सहा ही खासदारांनी आधी आपल्या खासदारकीचा राजीनामा द्यावा. मग खुशाल ज्या पक्षात जाऊन शेण खायचा आहे ते खावं, असा संतप्त इशारा ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी दिला. हे ऑपरेशन टायगर नसून ऑपरेशन गद्दार आहे. फुटीर खासदार हे टायगर नाहीत. लबाड लांडगे आहेत, असा हल्लाबोल यावेळी काळेंनी केला.

ठाकरे शिवसेनेच्या खासदारांनी केलेल्या बंडा नंतर अहिल्यानगरमध्ये कार्यकर्त्यांमध्ये संताप उसळला. ठाकरे शिवसेनेसह, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवई गटाच्या वतीने फुटीर खासदारांच्या गाढवावरील प्रतिमांना जोडे मारत पायदळी तुडविण्यात आले. बाजारपेठेत झालेली तीव्र




निदर्शने, जोरदार घोषणाबाजी मुळे परिसर दणाणून गेला होता. यावेळी फुटीर खासदारांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळी संजय झिंजे, रावजी नांगरे, दीपक भोसले, मनोज गुंदेचा, अनिस चुडीवाला, विलास उबाळे, प्रतीक बारसे, सुशांत म्हस्के, राम वाणी, राम झिने, चंद्रकांत उजागरे, उषा भगत, शारदा वाघमारे, मीना घाटगे, शैला लांडे, विकेश गुंदेचा, सागर चाबुकस्वार, सचिन नवघिरे, बाळासाहेब जरे, सुजय लांडे, ऋतुराज आमले, शंकर आव्हाड, गणेश आपरे, राम धोत्रे, आकाश अल्हाट, विकास भिंगारदिवे, विजय शिरसाट, स्वप्निल साठे, महावीर मुथा, किशोर कोतकर, आप्पा लांडगे, विनोद शिरसाट, जयराम आखाडे, धनंजय देशमुख आदींसह ■ पान ४ वर

## वृध्देश्वर कारखाण्याच्या संचालकपदी किलबिले चौथ्यांदा बिनविरोध

**सतिष जगताप**
**दैनिक आकर्षण**



**खरवंडी कासार –** पाथर्डी तालुक्यातील औरंगपुर रहवाशी स्व. लोकनेते राजीवजी आप्पासाहेब राजळे यांचे कट्टर समर्थक बाबासाहेब किलबिले यांची वृध्देश्वर सहकारी साखर कारखाणा संचालकपदावर सलग चौथ्यांदा बिनविरोध निवड झाली असुन सदर निवडी बद्दल अभिनंदनाचा वर्षाव विविध प्रसार माध्यमातुन होत आहे.

राजळे हाच आमचा पक्ष भुमिका बाबासाहेब किलबिले यांची आहे त्यांनी सर्व सामान्यांची कामे आमदार मोनिकाताई राजळे यांच्या माध्यमातुन मार्गी लावली राजकारणापेक्षा समाजकारणाची आवड किलबिले यांना होती आहे ते सर्व सामान्यांच्या सुख दुःखात नेहमी अग्रेसर असल्याचे निदर्शनाश आले किलबिले यांचे राजकारणा बरोबर समाजकारण करण्याचे स्वप्न आमदार राजळे यांच्या माध्यमातुन साकारत आहे पत्रकारांशी बोलताना वृद्धेश्वर कारखाण्याचे नव निर्विचीत संचालक बाबासाहेब किलबिले म्हणाले कि सलग चार वेळा संचालक पदावर विराजमान संधी दिली विश्वास दाखवला या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही अधिक जोमाने सर्व सामान्यांचे प्रश्न समस्या सोडवण्यावर भर राहील असे मत व्यक्त केले.

## जबरी चोरी करून पसार झालेले आरोपी २४ तासांत जेरबंद



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील काटवन रेल्वे स्टेशन रोड परिसरात एका इसमाला लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करून ऑनलाईन व रोख पैसे लुटणाऱ्या टोळीचा कोतवाली पोलिसांनी अवघ्या २४ तासांत पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून गुन्ह्यातील रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

दिनांक १५ जून रोजी फिर्यादी विशाल रावसाहेब भोर (रा. चास ता. नगर) यांना आरोपींनी गायकेमळा परिसरात गाठून लाकडी दांडक्याने मारहाण करीत खिशातील रोख रक्कम तसेच मोबाईलद्वारे ऑनलाईन पैसे बळजबरीने काढून घेऊन आरोपी पसार झाले होते.

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि डीवायएसपी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली कोतवालीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. गुन्हे शोध पथकाचे पोसई प्रवीण पाटील आणि त्यांच्या टीमने तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारांच्या आधारे शोध घेत दोन संशयितांना ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव हर्षद जालिंदर साळवे (रा. भीमवाडी, अहिल्यानगर) असून, दुसरा आरोपी विधीसंघर्षित बालक असल्याने त्याला कायदेशीर प्रक्रियेनंतर पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. आरोपींनी हा गुन्हा त्यांचे साथीदार विवेक पंडित व अभिषेक नरवडे (रा. श्रीरामपूर) यांच्यासोबत मिळून, ओंकार निभवणे (या. बोहरी चाळ, स्टेशन रोड) याची मोटारसायकल वापरून ■ पान ४ वर

## शिवसेनेचा वर्धापन दिन आणि खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांचा पक्षप्रवेश; शिवसैनिकांचा जल्लोष



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी–** शिवसेना पक्षाचा वर्धापन दिन आज अहिल्यानगरमध्ये अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात शिवसेना पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठा उत्साह दर्शवला.

हॉटेल सीटी हार्ट येथे आयोजित या कार्यक्रमास जिल्हाप्रमुख कमलाकर कोते आणि नितीन औताडे यांच्या मार्गदर्शनाखाली शेकडो शिवसैनिक उपस्थित होते. याप्रसंगी संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली. पक्षाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून शिवसैनिकांनी फटाक्यांची आतषबाजी केली आणि एकमेकांना पेढे भरवत आनंद साजरा केला.

**खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या प्रवेशाचे स्वागत** या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे शिर्डी लोकसभा ■ पान ४ वर

## महात्मा फुले चौकात स्व. अरुण काका जगताप यांच्या २० फुटी भव्य प्रतिमेचे अनावरण

### अहिल्यानगरवरील प्रेम कधीही कमी होऊ दिले नाही; काका होते समतावादी विचारांचे लोकनेते । मित्रमंडळींकडून जुन्या आठवणींना उजाळा





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महात्मा फुले चौक येथे जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते, स्वर्गीय माजी आमदार अरुण काका जगताप यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी अरुण काका जगताप ट्रस्ट मित्र मंडळाच्या वतीने त्यांच्या २० फुटी भव्य प्रतिमेचे अनावरण करण्यात आले. या सोहळ्यात काकांच्या कार्याचा गौरव करत मित्रमंडळींनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.

यावेळी शहराचे आमदार संग्राम जगताप, गुणे आयुर्वेद शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप, माजी उपमहापौर गणेश भोसले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, मा महापौर भगवान फुलसौंदर, नगरसेवक विकी जगताप, प्रकाश भागानगरे, माजी सभापती कुमारसिंह वाकळे, माजी नगरसेवक संजय चोपडा, सुंतीलाल कोठारी, राजेंद्र चोपडा, शिवाजी चव्हाण, प्रा. माणिकराव विधाते, बाळासाहेब पवार, नगरसेवक महेश तवले, बाबुशेठ नागरगोजे, माजी सभापती अविनाश घुले, विपुलशेटीया, गोरख पडोळे, प्रकाश कराळे, जनक अहुजा, राजेश भंडारी, अजित जगताप, मंगेश खताळ, भाऊसाहेब पांडुळे, ज्ञानदेव पांडुळे, धर्मा कराडे, डॉ. विजयकुमार भंडारी, संतोष सूर्यवंशी, तुकाराम तावरे, वैभव जगताप, ज्ञानेश्वर रासकर, विशाल पवार, शिवाजी भंडारी, अनिल मुरकुटे, दत्ता पानसरे, विजय गव्हाळे, मोहित पंजाबी, नरेंद्र बाफना, भाऊ हुच्चे, कांता अष्टेकर, योगेश ठुबे, प्रा. अरविंद शिंदे, सत्यम गुंदेचा, मोहन कदम, शामराव भिंगारदिवे, लक्ष्मण पोकळे, राजेंद्र ओस्तवाल, सागर मुर्तडकर, अजिंक्य बोरकर आदींसह मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

यावेळी मित्रमंडळींच्या वतीने मनोगत व्यक्त करताना सांगण्यात आले की, महात्मा फुले चौक आणि अरुण काका यांचे अतूट नाते होते. काकांना भेटण्यासाठी दररोज मोठ्या संख्येने नागरिक या ठिकाणी येत असत. त्यांच्या दृष्टीने गरीब-श्रीमंत, जात-पात असा कोणताही भेदभाव नव्हता. सर्व जातीधर्मातील लोकांना सोबत घेऊन त्यांनी जनतेचे प्रश्न ■ पान ४ वर

## विकासाची वाट खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचविणार - दीपक लंके

### नांदूर पठार येथे मातोश्री शेतपाणंद रस्त्यांच्या भूमिपूजनाचा सोहळा उत्साहात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** खासदार निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण भागातील विकासकामांना प्राधान्य दिले जात आहे. शेतपाणंद रस्त्यांमुळे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होत असून नांदूर पठारमध्येही विकासाची गती कायम राहील. गावातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन अधिकाधिक विकासकामे मार्गी लावण्याचा प्रयत्न राहणार आहे, विकासाची वाट आता खेड्यापाड्यात पोहोचवायची आहे अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते दीपक लंके यांनी दिली.

पारनेर तालुक्यातील नांदूर पठार येथे लोकनेते खासदार निलेश लंके यांच्या विशेष प्रयत्नांतून मंजूर झालेल्या मातोश्री शेतपाणंद रस्त्यांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते दीपक लंके यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १९ जून २०२६) उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. यावेळी परिसरातील ग्रामस्थ, शेतकरी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

या कार्यक्रमास टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाच्या नेत्या सोनियाताई रवींद्र राजदेव, खासदार निलेश लंके ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने माजी अध्यक्ष स्व.शं.भा.व्यापारी यांना भावपूर्ण श्रद्धांजली



अहिल्यानगर- सुमारे ५८ वर्षांची शैक्षणिक परंपरा लाभलेल्या श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष स्व.श्री. शंकर भास्कर व्यापारी यांचे दि. १० जून रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ संस्थेच्या वतीने सावेडीच्या समर्थ प्रशालेमध्ये समर्थ सभागृहात भावपूर्ण श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ,व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी,सेक्रेटरी प्र.स.ओहोळ,सेक्रेटरी सुरेश क्षीरसागर ,कार्यकारिणी सदस्य ॲड. किशोर देशपांडे ,सुनील जोशी,प्राचार्या तथा मुख्याध्यापिका सौ.वसुधा जोशी,सौ.धनश्री गुंफेकर,मुख्याध्यापक श्री सुनील कानडे व श्री अजय महाजन, माजी मुख्याध्यापक श्री दुर्योधन कासार ,पर्यवेक्षक श्री लक्ष्मीकांत कुलकर्णी यांच्यासह चारही विभागांचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सभेच्या प्रारंभी स्व.श्री. व्यापारी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळत आदरांजली वाहिली. श्रद्धांजली सभेमध्ये विविध मान्यवरांनी मनोगते व्यक्त करताना श्री.व्यापारी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचा, संस्थेच्या जडणघडणीत दिलेल्या मोलाच्या योगदानाचा तसेच शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यांच्या कार्यामुळे संस्थेच्या विकासाला नवी दिशा मिळाल्याचे वक्त्यांनी नमूद केले.सभेच्या समारोपात श्री प्र.स.ओहोळ यांनी स्व.श्री. व्यापारी यांच्या शैक्षणिक, सामाजिक व संस्थात्मक योगदानाचा गौरवपूर्ण आढावा घेत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. ‘‘त्यांच्या कार्याचा आदर्श भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील, संस्थेच्या प्रसारामध्ये , जडणघडणीमध्ये व उच्च दर्जाची शैक्षणिक गुणवत्ता समृद्ध करण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा होता‘‘असे त्यांनी सांगितले.अत्यंत भावनिक वातावरणात पार पडलेल्या या श्रद्धांजली सभेची सांगता पसायदानाने करण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अमोल बागुल यांनी केले तर स्व. व्यापारी यांच्या प्रेरणादायी व्यक्तिचित्राचा वापर करत नाविन्यपूर्ण फलकलेखन कलाशिक्षक श्री विवेक भारताल यांनी केले.

### महावितरणच्या कथित वीज चोरी कारवायांविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन



अहिल्यानगर- महावितरण कंपनीकडून वीज चोरीविरोधी कारवाईच्या नावाखाली कथितपणे सेटलमेंट, आर्थिक वसुली आणि गोरगरीब व्यावसायिकांना लक्ष्य केले जात असल्याचा आरोप करत अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाद्वारे महावितरणच्या ग्रामीण अभियंता कार्यालयासह संबंधित वीज चोरी पथकाच्या कामकाजाची संपूर्ण खातेनिहाय चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली. प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे यांच्यासह दत्ता वामन, श्रीधर शेलार, विजय वहाडणे, सुभाष काकडे, बबन शिंदे, बाजीराव कलढोणे, राजकुमार पासवान, हरीओम राजपूत, संदीप राजपूत, महेश गुंजकर, राम भोर, अरविंद चौधरी, शंभू यादव, दिनेश यादव, कृष्णा कुमार, चंद्रकांत मगर, कैलास शर्मा, सुधाकर यादव, रवींद्र राजपूत, अरविंद राजपूत आणि मोठ्या संख्येने कामगार व पदाधिकारी सहभागी झाले होते. आंदोलनकर्त्यांनी महावितरण कंपनीवर वीज कायद्याचा गैरवापर केल्याचा गंभीर आरोप केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, काही कर्मचारी आणि अधिकारी यांच्या साखळीमार्फत खाजगी एजंटांच्या माध्यमातून लाखो रुपयांची आर्थिक उलाढाल होत असून वीज चोरीविरोधी मोहिमेचा वापर दबावतंत्र म्हणून केला जात आहे.संघटनेने आरोप केला की, एप्रिल महिन्यात वीज चोरीविरोधी विशेष पथकाच्या नावाखाली काही ठिकाणी कारवाई करण्यात आली.

# प्राथमिक शाळा हाच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खरा पाया– बा. ठ. झावरे

**वासुंदे येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नवगत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत!**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** शिक्षण हाच ग्रामीण भागाच्या विकासाचा खरा पाया आहे. जिल्हा परिषद शाळेत ग्रामपंचायत प्रशासन, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक आणि ग्रामस्थांनी एकत्रित येऊन केलेले हे नवागतांचे स्वागत कौतुकास्पद आहे. जेव्हा संपूर्ण गाव आणि शाळा मिळून प्रयत्न करतात, तेव्हाच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. या गुणवंत विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आणि शाळेच्या सक्षमीकरणासाठी आम्ही सर्व स्तरांतून सदैव कटिबद्ध राहू. असे मत श्री गुरुदत्त मल्टीस्टेट पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष बा. ठ. झावरे पाटील यांनी व्यक्त केले आहे. उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपून १५ जून रोजी नेहमीप्रमाणे शाळा सुरू झाल्या आहेत. पहिल्याच दिवशी नवीन कपडे, नवीन दप्तरे घेऊन लगबग करत नवीन विद्यार्थ्यांचे शाळेत आगमन झाले. वासुंदे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये या नवागत विद्यार्थ्यांचे पहिल्या दिवशी मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात स्वागत करण्यात आले.

प्राथमिक शाळा हा खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या जडणघडणीचा आणि शिक्षणाचा पाया समजला जातो. हाच पाया मजबूत करण्यासाठी आणि पहिल्याच दिवशी मुलांच्या मनात शाळेविषयी गोडी निर्माण व्हावी, या उद्देशाने या स्वागत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या पहिल्या दिवशी आलेल्या चिमुरड्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पाहायला मिळत होता.

या विशेष कार्यक्रमासाठी वासुंदे गावच्या गुरुदत्त पतसंस्थेचे चेअरमन बा. ठ. झावरे, गावच्या सरपंच विमल झावरे, उपसरपंच बाळासाहेब शिंदे, पी. डी. बर्वे, बापूसाहेब गायके आणि शिवाजी झावरे सर प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पोपट हिंगडे, पा. ल. बर्वे, हरिभाऊ गायखे, शालेय व्यवस्थापन सदस्या कावेरी झावरे, केंद्रप्रमुख श्री. लोंढे सर, शाळेच्या मुख्याध्यापिका सुनिता रोहकले मॅडम, सहशिक्षिका शेळकंदे मॅडम, जाधव मॅडम आणि पवार मॅडम आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षिकांनी व व्यवस्थापन समितीने विशेष परिश्रम घेतले. पहिल्याच दिवशी झालेल्या या सुंदर स्वागतामुळे विद्यार्थ्यांचा शाळेचा पहिला दिवस अत्यंत संस्मरणीय ठरला.

> **शाळेचा पहिला दिवस हा मुलांच्या आयुष्यातील एक टप्पा असतो. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांनंतर शाळेत आलेल्या नवगत विद्यार्थ्यांचे हसतमुखाने स्वागत करताना सर्व शिक्षिकांना व ग्रामस्थांना मनापासून आनंद होत आहे. जिल्हा परिषद शाळा हाच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खरा पाया आहे. असे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पोपट हिंगडे व सर्व शिक्षक वृंद यांनी सांगितले.**

# शेवगावमध्ये महिलेचे दागिने लुटणारी तिघांची टोळी गजाआड

**एलसीबीच्या कारवाईत साडेसहा लाखांचा मुद्देमाल जप्त**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शेवगाव येथील वरूर चौकातून कारमधून जाणाऱ्या महिलेचे सोन्याचे दागिने बळजबरीने हिसकावून नेणाऱ्या तीन आरोपींना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने जेरबंद केले आहे. त्यांच्याकडून ६ लाख ५० हजार रुपये किमतीची ५० ग्रॅम सोन्याची लगड जप्त करण्यात आली असून, जिल्ह्यातील इतर ७ गुन्हेही उघडकीस आले आहेत.

दिनांक ३० नोव्हेंबर २०२५ रोजी फिर्यादी रंजना जेठे या चारचाकीने जात होत्या. वरूर चौकात गाडीचा वेग कमी झाला असता, दुचाकीवरून आलेल्या दोघांनी खिडकीतून हात घालत त्यांच्या गळ्यातील सोन्याचे गंठण आणि राणीहार ओरबाडून नेला होता. याप्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे व त्यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण व खबऱ्यामार्फत माहिती काढली. तारकपूर बस स्टँड परिसरात सापळा रचून लखन विजय काळे (२३) आणि कानिफनाथ झिपरे (३९) यांना संशयावरून ताब्यात घेतले.

**सात गुन्हे उघडकीस**

चौकशीदरम्यान त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली व चोरलेले दागिने भारत दहिवाळकर (वय ५१) याला दिल्याचे सांगितले. पोलिसांनी या तिघांनाही अटक करून त्यांच्याकडून साडेसहा लाखांचे सोने जप्त केले आहे. या चौकशीत त्यांच्याकडून शेवगाव, पाथर्डी, नेवासा आणि सोनई पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जबरी चोरीचे आणखी ७ गंभीर गुन्हे उघडकीस आले आहेत. पुढील तपास शेवगाव पोलीस करत आहेत.

# शहरात जलतरण स्पर्धा उत्साहात; जिल्हा युवा सेनेचा उपक्रम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा युवा सेनेच्या वतीने शहरात जलतरण स्पर्धा उत्साहात पार पडली. स्व. धर्मवीर माजी आमदार अनिल भैया राठोड जलतरण तलाव येथे झालेल्या या स्पर्धेत शालेय विद्यार्थ्यांसह युवक-युवती सहभागी झाले होते. शिवसेना नेते व युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला.

युवा सेनेचे जिल्हाप्रमुख प्रशांत (पप्पू) भाले, उपजिल्हाप्रमुख महेश शेळके,युवासेना उपशहर प्रमुख मुन्ना भिंगारदिवे, तसेच युवासेना, यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. स्पर्धेचे उद्घाटन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे नगरसेवक योगीराज गाडे यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेत सहभागी झालेल्या बाल स्पर्धकांनी आपल्या जलतरण कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. या जलतरण स्पर्धेत धनश्री



कोकणे हिने प्रथम क्रमांक पटकावला. अर्णव गुंड याने द्वितीय तर शौर्य जाधव याने तृतीय क्रमांक मिळविला. विजेत्या स्पर्धकांना ट्रॉफी व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच या स्पर्धेमध्ये ५० मुला मुलींनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये बाकीच्या स्पर्धकांना देखील सुवर्ण, रौप्य व कास्य पदक देऊन सत्कार करण्यात आला

यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव, नगरसेवक योगीराज गाडे, अंबादास शिंदे, डॉ. श्रीकांत चिमटे, प्रशांत पाटील, प्रथमेश महेंद्रकर, बाळासाहेब जरे, जलतरण कोच गणेश देशपांडे, तसेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसाला फटाक्यांची आतषबाजी, फ्लेक्सबाजी आदी वायफट खर्चाला फाटा देऊन विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला होता. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

या अभिनव उपक्रमामुळे मुलांमध्ये क्रीडाप्रेम, शारीरिक तंदुरुस्ती आणि स्पर्धात्मक वृत्ती विकसित होण्यास मदत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# पुणे-साईनगर शिर्डी एक्सप्रेस सुरू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पुणे-साईनगर शिर्डी एक्सप्रेसला १७ जून २०२६ रोजी पुणे रेल्वे स्थानकावर केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हिरवा कंदील दाखविण्यात आला. यावेळी पुणे रेल्वे यार्ड पुनर्बांधणीसह विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांचे भूमिपूजन करण्यात आले.

कार्यक्रमास केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार विवेक कोल्हे तसेच मध्य रेल्वेच्या मुख्यालय रेल्वे प्रवासी सल्लागार समितीचे सदस्य सुदर्शन डुंगरवाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी पुणे येथे सुमारे ६०० कोटी रुपयांच्या विविध विकासकामांची माहिती देत भविष्यात आणखी २० अतिरिक्त रेल्वेगाड्या सुरू करण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचे सांगितले. तसेच महाराष्ट्रातील १३२ स्थानकांच्या पुनर्विकासाचे काम सुरू असून पुणेनाशिक रेल्वेमार्ग आणि वंदे भारत स्लीपर सेवेबाबतही त्यांनी माहिती दिली.

पुणेसाईनगर शिर्डी एक्सप्रेस सुरू करण्यासाठी मध्य रेल्वेच्या मुख्यालय रेल्वे प्रवासी सल्लागार समितीचे सदस्य सुदर्शन डुंगरवाल यांनी सातत्याने पाठपुरावा केला

# राजमाता जिजाऊ स्मृतिदिनी ४८ ज्येष्ठ नागरिकांना नवदृष्टीचे वरदान



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतिदिनानिमित्त समाजातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील ज्येष्ठ नागरिकांना नवदृष्टी देण्याचा अनोखा सामाजिक उपक्रम फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात आला. नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबिराच्या माध्यमातून ४८ ज्येष्ठ नागरिकांवर पुणे येथे यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या. शस्त्रक्रियेनंतर नवदृष्टी मिळालेले ज्येष्ठ नागरिक राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतिदिनी अहिल्यानगरात परतले आणि त्यांनी जिजाऊंना अभिवादन करत त्यांच्या कार्याचा जयघोष केला.

शहरात परतल्यानंतर या सर्व ज्येष्ठ नागरिकांचे फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी स्वागत केले. यावेळी शस्त्रक्रियेनंतर प्रथमच स्पष्टपणे पाहण्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. अनेक ज्येष्ठ नागरिकांनी या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत फिनिक्स फाऊंडेशनने त्यांच्या आयुष्यात पुन्हा प्रकाश आणल्याची भावना व्यक्त केली.

फिनिक्स सोशल फाऊंडेशनने समाजसेवेचा वेगळा आदर्श निर्माण करत महापुरुषांच्या जयंती आणि पुण्यतिथी सामाजिक कार्यातून साजऱ्या करण्याची परंपरा जोपासली आहे. राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतिदिनी उपेक्षित, गरजू आणि दृष्टीदोष असलेल्या नागरिकांना नवदृष्टी देऊन त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. समाजातील दुर्लक्षित घटकांना आधार देण्याच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

फाऊंडेशनच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या नेत्र तपासणी शिबिरामध्ये शेकडो रुग्णांची तपासणी करण्यात आली होती. त्यातून मोतीबिंदूची समस्या असलेल्या ४८ ज्येष्ठ नागरिकांची निवड करण्यात आली. त्यानंतर पुणे येथील के. के. आय बुधराणी रुग्णालयात त्यांच्यावर पूर्णपणे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या. प्रवास, तपासणी, शस्त्रक्रिया आणि आवश्यक वैद्यकीय सुविधा या सर्व सेवा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आल्या.

याबाबत बोलताना फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी सांगितले की, आर्थिक दुर्बल घटकांतील अनेक नागरिक केवळ आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित राहतात. विशेषतः मोतीबिंदूसारख्या आजारामुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांचे दैनंदिन जीवन कठीण होते. अशा गरजू नागरिकांना पुन्हा दृष्टी मिळवून देण्यासाठी फिनिक्स फाऊंडेशनने जिल्हाभर दृष्टीदानाची मोठी चळवळ उभी केली आहे.

# माँ जिजाऊंच्या स्मृती सर्वांच्या मनात कायम - उदय अनभुले

**मातृतीर्थ सिंदखेड राजा ते पाचाड (रायगड) अभिवादन । यात्रेचे मराठा पतसंस्थेच्यावतीने स्वागत**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतीदिनानिमित्त सिंदखेड राजा (जन्मस्थळ ) ते पाचाड (स्मृतीस्थळ) अशी अभिवादन यात्रेचे नगरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे मराठा नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने स्वागत करण्यात आले. याप्रसंगी पतसंस्थेचे जेष्ठ संचालक ज्ञानदेव पांडूळे , बाळकृष्ण काळे व्हाईस चेअरमन उदय अनभुले ,सतिश इंगळे ,संयोजक द्वारकाधीश राजेभोसले, लक्ष्मण सोनाळे,अच्युत गाडे ,अशोक वारकड ,संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे ,मराठा सेवा संघाचे दक्षिण जिल्हाध्यक्ष प्रविण दहातोंडे ,ओम इंगळे ,हर्षल म्हस्के ,ॲड गजेंद्र दांगट ,अशोक कुटे ,अतुल लहारे ,राजेंद्र निबाळकर ,राजेंद्र म्हस्के ,डॉ समीर कोकाटे ,प्रशांत नगरकर ,राजेंद्र उदागे ,श्रीपाद दगडे ,इंजि श्रीकांत निबाळकर ,अमोल राजे भोसले , नगरसेवक गणेश कवडे ,अजय चितळे ,अनुराधा येवले ,मनीष रोहकले ,सोनू चोधरी ,कोमल ठुबे ,अमोल लहारे आदी उपस्थित होते. यावेळी या यात्रेचे मुख्य आयोजक व जिजाऊंचे वंशज शिवाजीराजे जाधव यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

यावेळी व्हाईस चेअरमन उदय अनभुले म्हणाले, माँ जिजाऊ यांचे कार्य सर्वपरिचित आहे, छत्रपती शिवाजी महाराजांना घडविण्यात त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. रयतची काळजी घेणार्या आणि दुष्मानांनाही घाम फोडणारे असे त्यांचे व्यक्तीमत्व होते. त्यांच्या स्मृती सर्वांच्या मनात कायम रहावे, यासाठी जयंती व स्मृतीदिनी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. जन्मस्थळ ते स्मृतीस्थळ अशा या अभिवादन यात्रेमुळे त्यांचे कार्य अधिक व्यापक होईल, असे सांगितले.

१७ जून राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचा स्मृतिदिन याचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे यंदाही अभिवादन यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही यात्रा नगरमध्ये आली असता छत्रपती शिवाजी महाराज चौक, एस. टी. स्टॅन्ड, नगर येथे महाराजांना अभिवादन करून यात्रा पुढे मार्गस्थ झाली. यावेळी मोठया प्रमाणावर शिवशंभु भक्त व मराठा सेवा संघ, मराठा पतसंस्था, राजमाता जिजाऊ प्रतिष्ठान आदीचे पदाधिकारी उपस्थित होते.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### क्रांती सानप-पालवे यांची मराठी राजभाषा जिल्हाध्यक्षपदी निवड



अहिल्यानगर- ग्रामीण विकास मंडळ संचलित चक्रधर स्वामी प्राथमिक विद्यालयच्या शिक्षिका क्रांती सानप पालवे यांची मराठी राजभाषा संवर्धन कृती समितीच्या जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. मराठी भाषेचा प्रचार-प्रसार, जतन, संवर्धन आणि दैनंदिन व्यवहारात तिचा अधिकाधिक वापर वाढवा या उदात्त उद्देशाने ही कार्यकारणी गठीत करण्यात आली आहे. क्रांती सानप पालवे उत्तम कवियत्री व लेखिका असून आकाशवाणी तसेच विविध वृत्तपत्रांमध्ये त्यांच्या कविता व लेख प्रसिद्ध झालेल्या आहेत. हिंदी पंडित परीक्षेत सुद्धा त्यांनी राज्यात प्रथम क्रमांकाचा बहुमान मिळविला असून त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांनी नुकत्याच झालेल्या मराठी राजभाषा परीक्षेत उत्तम कामगिरी केली आहे. अनेक उत्तम कवितांसाठी त्यांना लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट कोल्हापूर संचलित राज्यस्तरीय काव्य लेखन स्पर्धेत त प्रथम क्रमांक व पुरस्कार मिळालेला आहे. त्यांच्या याच कामाची दखल घेऊन मराठी राजभाषा संवर्धन कृती समिती राज्य संघटनेच्या प्रमुख सुलोचना क्षीरसागर व अमोल क्षीरसागर व राज्य कार्यकारणी यांनी क्रांती सानप यांची जिल्हाध्यक्षपदी सर्वानुमते निवड केली. त्यांच्या या यशाबद्दल ग्रामीण विकास मंडळाचे अध्यक्ष संपत बारस्कर, सचिव भूषण अनुभुले, खजिनदार सुदाम भोर व प्राथमिकचे मुख्याध्यापिका मनीषा कासार, माध्यमिकचे मुख्याध्यापक रावसाहेब सातपुते, पर्यवेक्षक शंकरराव बारस्कर तसेच सर्व विश्वस्त मंडळ यांनी अभिनंदन केले आहे.

### सोशल मीडियावरील बदनामीप्रकरणी कारवाईची मागणी



अहिल्यानगर- मानव विकास परिषदेचे महाराष्ट्र राज्य युवक संघटक तुकाराम हनुमंत गेरंगे यांनी सोशल मीडियावर आपल्याविरोधात करण्यात आलेल्या कथित खोट्या व बदनामीकारक आरोपांप्रकरणी पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन निवेदन सादर केले आहे. संबंधित जालिंदर रायभान निकम व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करून बदनामीकारक पोस्ट तात्काळ हटविण्याची मागणी त्यांनी केली आहे.निवेदनात गेरंगे यांनी नमूद केले आहे की, निकम हे शेवगाव तालुक्यातील मळेगाव येथील रहिवासी आहेत श्री समर्थ सद्गुरू हरिहर महाराज संस्थान व महादेव मंदिर ट्रस्टचे संचालक म्हणून सन २०२४ ते २०२९ या कालावधीसाठी तुकाराम गेरंगे हे निवडून आले आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, जालिंदर रायभान निकम हे यापूर्वी संबंधित ट्रस्टमध्ये सचिव म्हणून कार्यरत होते. त्यांच्या कार्यकाळानंतर ट्रस्टच्या आर्थिक हिशोबाची मागणी करण्यात आल्याने वैयक्तिक द्वेषातून निकम यांनी सोशल मीडियावर खंडणी मागितल्याचा व ब्लॅकमेल केल्याचा आरोप करणाऱ्या पोस्ट प्रसारित केल्या आहेत. गेरंगे यांनी या सर्व आरोपांना फेटाळून लावत ते पूर्णपणे खोटे व बिनबुडाचे असल्याचे स्पष्ट केले आहे. संबंधित पोस्टमुळे त्यांच्या सामाजिक प्रतिमेला धक्का बसला असून समाजामध्ये बदनामी झाल्याचा दावा त्यांनी निवेदनात केला आहे. याप्रकरणी संबंधित व्यक्तीविरोधात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३५६ तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून बदनामीकारक मजकूर तातडीने हटविण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी त्यांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे. तसेच जालिंदर महाराज निकम यांनी केलेला आरोप सिद्ध करावा न केल्यास सममाज्यात बदनामी केली म्हणून गुन्हा दाखल करावा. दरम्यान, या प्रकरणाची सखोल चौकशी करून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही गेरंगे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

फॅमिली कोर्ट बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी

## ॲड.शिवाजी कराळे तर उपाध्यक्षपदी ॲड. अनिता दिघे आणि सचिवपदी ॲड. शिवाजी सांगळे यांची बिनविरोध निवड



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सुमारे २०० वर्षांची वैभवशाली परंपरा लाभलेल्या शहरातील जुन्या न्यायालयात असलेल्या कौटुंबिक न्यायालयातील वकिलांच्या फॅमिली कोर्ट ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड शिवाजी अण्णा कराळे यांची तर उपाध्यक्षपदी ॲड.अनिता दिघे, कार्याध्यक्षपदी ॲड.लक्ष्मण कचरे, सचिवपदी ॲड.शिवाजी सांगळे, खजिनदारपदी ॲड.बाबाजी सांगळे व महिला सचिवपदी ॲड पल्लवी दातीर यांच्यासह कार्यकारणी सदस्यांची बिनविरोध निवड झाली. असोसिएशनचे मावळते अध्यक्ष ॲड. लक्ष्मण कचरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या असोसिएशनच्या बैठकीत सर्वानुमते नूतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीनंतर सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. २०२६ ते २८ या दोन वर्षांसाठी या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

या बैठकीमध्ये असोसिएशनच्या कार्यकारिणी सदस्यपदी जेष्ठ विधिज्ञ ॲड.सुरेश लगड, ॲड.मच्छिंद्र आंबेकर, ॲड.कल्याण पागर, ॲड.पोपट म्हस्के, ॲड.मनीषा केळगंद्रे-शिंदे, ॲड.राजेश कावरे व ॲड.कु.किरण जाधव आदींच्याही सर्वानुमते नियुक्त्या करण्यात आल्या. या बैठकीत अध्यक्ष पदासाठी शिवाजी कराळे यांच्या नावाची सूचना सुरेश लगड यांनी मांडली त्यास राजेश कावरे यांनी अनुमोदन दिले.

फॅमिली कोर्ट बार असोसिएशनचे नूतन अध्यक्ष ॲड.शिवाजी अण्णा कराळे हे गेल्या ३१ वर्षांपासून वकील क्षेत्रात कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी २०१३ ते १४ या काळात अहमदनगर बार असोसिएशनच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली होती. तसेच २०२२ साली ते कौटुंबिक न्यायालय बार असोसिएशनचे संस्थापक अध्यक्षही होते. आता दुसऱ्यांदा या पदाची जबाबदारी ॲड. कराळे यांना मिळाली आहे. यावेळी ॲड.शिवाजी कराळे म्हणाले, जुन्या न्यायालयाला २०० वर्ष पूर्ण झाले आहेत. अशा मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या न्यायालयातील फॅमिली कोर्ट बार असोसिएशनच्या अध्यक्षपदाची जबाबदारी मिळणे हे माझे मोठे भाग्य आहे. अध्यक्षपदाची जबाबदारी पुन्हा माझ्यावर टाकून सर्व सदस्यांनी मोठा विश्वास व्यक्त केला आहे. या पदाच्या माध्यमातून वकिलांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्याबरोबरच बार व बेंच मध्ये सकारात्मक वातावरण ठेवण्यास प्राधान्य देऊ. तसेच सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, पर्यावरण असे विविध क्षेत्रातील उपक्रम राबवण्यावर भर देणार आहे. सर्व वकील बंधुभगिनींना बरोबर कामकाज करणार आहे.

## गुणवंतांचा गौरव, संस्कारांचा सन्मान आणि समाजसेवेचा वसा

### पद्मशाली युवा शक्तीच्या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** समाजातील होतकरू, गुणवंत आणि कर्तृत्ववान व्यक्तींना प्रोत्साहन देऊन त्यांच्या यशाची दखल घेणे ही कोणत्याही समाजाच्या प्रगतीची गुरुकिल्ली असते. याच भावनेतून पद्मशाली युवा शक्ती ट्रस्ट व पद्मशाली महिला शक्ती, अहिल्यानगर गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सेवाभावी उपक्रम राबवत असून समाजातील गुणवंतांचा गौरव करण्याची सुंदर परंपरा जपली आहे.



या परंपरेचाच एक भाग म्हणून दि. १७ जून २०२६ रोजी अहिल्यानगरातील तीन तेजस्वी चिमुकल्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. आपल्या जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर यशाचे नवे मानदंड निर्माण करणाऱ्या कु. रिया रत्नाकर श्रीपत, चि. रुद्र रत्नाकर श्रीपत आणि चि. श्लोक संतोष दोमल यांचा त्यांच्या राहत्या घरी जाऊन शाल, श्रीफळ व गौरवपत्र देऊन गौरव करण्यात आला.

पाईपलाईन हडको येथील रिया आणि रुद्र श्रीपत या भावंडांनी किक बॉक्सिंग या खेळात जिल्हा, राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके मिळवत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या या यशामुळे समाजासह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याचा गौरव वाढला आहे.

तर दुसरीकडे, रेसिडेन्शियल हायस्कूलमध्ये इयत्ता पाचवीत शिक्षण घेणाऱ्या श्लोक संतोष दोमल याने सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षा २०२५ मध्ये १०० पैकी ९६ गुण मिळवत राज्यात तृतीय क्रमांक पटकावला आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशामुळे त्याची इस्रो () येथे शैक्षणिक सहलीसाठी निवड झाली असून विज्ञान क्षेत्रातील त्याची झेप समाजासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

या प्रसंगी उपस्थितांनी या चिमुकल्यांच्या यशाचे भरभरून कौतुक केले. त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावरील समाधान आणि अभिमान हा प्रत्येकासाठी प्रेरणादायी ठरला.

विशेष म्हणजे, पद्मशाली युवा शक्ती ट्रस्ट व पद्मशाली महिला शक्ती हे केवळ गुणवंतांचा गौरव करणारे व्यासपीठ नसून समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, आरोग्य शिबिरे, वृक्षारोपण, रक्तदान शिबिरे, गरजूंना मदत, सांस्कृतिक कार्यक्रम, महिलांच्या सक्षमीकरणासाठी उपक्रम तसेच समाजातील विविध घटकांना एकत्र आणणारे अनेक विधायक कार्यक्रम सातत्याने राबवत आहेत. समाजातील प्रतिभेला योग्य दिशा देणे आणि नव्या पिढीमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे हेच या संस्थांचे प्रमुख ध्येय असल्याचे या उपक्रमातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

कार्यक्रमात गौरवपत्राचे वाचन व सूत्रसंचालन श्री योगेश ताटी तसेच राष्ट्रपती पुरस्कार विजेते श्री नारायण मंगलारम सर यांनी केले. श्रीनिवास इप्पलपेल्ली, श्रीनिवास येल्लाराम, सुमित इप्पलपेल्ली आणि विराज म्याना यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दीपक गुंडू, सागर बोगा, योगेश म्याकल, श्रीनिवास इप्पलपेल्ली, नारायण मंगलारप, श्रीनिवास येल्लाराम, अजय म्याना, सतीश चिंता, विराज म्याना, आदेश गुंडू, सुमित इप्पलपेल्ली, योगेश ताटी, सुरेखा विद्दे, उमा कुरापटी, सारिका सिधम, निता बल्लाळ, लक्ष्मी म्याना, रेणुका जिंदम, सुनंदा नागुल आणि वैशाली कुरापटी आदी सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

## पियुष संचेती यांची चौथ्यांदा जेएसएसजीच्या रिजनल चेअरमनपदी नियुक्ती

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** तपकीर गल्ली येथील सामाजिक - राजकीय कार्येकर्ते भाजप अहिल्यानगर शहर जिल्हा मध्य मंडळ उपाध्यक्ष पियुष रसिकलाल संचेती यांची जैन समाजाच्या नावाजलेल्या जैन सोशल श्वेतांबर ग्रुप च्या महाराष्ट्र रिजनच्या (महाराष्ट्र-गोवा-कर्नाटक-तामिळनाडू- आन्धप्रदेश ) रिजनल चेअरमनपदी चौथ्यांदा सर्वानुमते फेरनियुक्ती झाली आहे.

पियुष संचेती यांच्या आतापर्यंतच्या कामाची हि पोहच असल्याचे बोलले जात आहे. पियुष संचेती सध्या भाजप अहिल्यानगर शहर जिल्हा मध्य मंडळ उपाध्यक्ष, भाजप पक्षाच्या अहिल्यानगर शहर विधानसभेच्या बूथ क्रमांक २०७ च्या बूथ प्रमुख, भाजप पक्षाच्या अहिल्यानगर शहर सह शक्ती केंद्र प्रमुख, भाजप पक्षाच्या अहिल्यानगर शहर सोशल वोरीयर्स म्हणून काम करत आहे. ते भारताचे प्रधानसेवक नरेंद्र मोदी साहेबांच्या मन कि बात कार्यक्रम चे अहिल्यानगर शहर मध्य मंडळ प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

जैन सोशल श्वेतांबर ग्रुप हा विविध सामाजिक उपकरणात सक्रिय सहभाग घेत असतो. या संघटनेच्या आताच पार पडलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री विजयजी मेहता नियुक्ती समितीप्रमुख श्री मनीषजी सुराणा यांच्या अध्यक्षतेखाली तसेच पूर्व अध्यक्ष श्री शिखरजी बाफना , श्री किशोरजी पोरवाल, श्री विमलजी नहार, श्री विजयजी ललवाणी, श्री संजयजी छाजेड यांच्या उपस्थितीत वर्ष २०२६-२०२८ ची सौ.लताजी - श्री संतोष (मामा ) जैन (संपादक जिनेंद्र कि आवाज पत्रिका ) यांच्या नेतृत्वाखाली नवीन कार्यकारणी जाहीर झाली त्यात अहिल्यानगर शहरातील राजकीय सामाजिक कार्यकर्ते श्री पियुष जी रसिकलालजी संचेती यांची महाराष्ट्र रिजनच्या रिजनल चेअरमनपदी फेरनियुक्ती झाली.

पियुष संचेती गेली २५ वर्षांपासून राजकीय, सामाजिक, क्षैक्षणिक कामात सक्रिय असून त्यांनी विविध क्षेत्रात वेगवेगळ्या सामाजिक राजकीय शैक्षणिक जबाबदाऱ्या सांभाळलेल्या आहेत. त्यांच्या या नियुक्ती बद्दल समाजाच्या प्रत्येक घटकातून कौतुक होत आहे. जैन सोशल श्वेतांबर ग्रुपच्या ''आनंद'' अहिल्यानगर शाखेचे संस्थापक अध्यक्ष आहेत. या नियुक्तीबद्दल बोलताना पियुष संचेती म्हंटले या वेळेस संघटनेच्या महाराष्ट्रातील प्रमुख शहरांत संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संतोष मामा जैन व बाकी कार्यकारिणीच्या मार्गदर्शनाखाली ग्रुप वाढवणार असल्याचे बोलले. महाराष्ट्र रिजनमध्ये महाराष्ट्र-गोवा-कर्नाटक-तामिळनाडू- आन्धप्रदेश या राज्यांचा समावेश होतो. त्यांच्या या नियुक्तीबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

## केडगावच्या चिपाडे मळा व धनश्री कॉलनी कॉलनीतील ड्रेनेज लाईनचा प्रश्न मार्गी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** केडगाव येथील प्रभाग क्रमांक १७ मधील चिपाडे मळा व धनश्री कॉलनी परिसरातील नागरिकांच्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या ड्रेनेज लाईनचा प्रश्न सोडविण्यात आला आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित असलेली ही महत्त्वाची समस्या सोडविण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांच्या निधीतून तसेच नगरसेविका अश्विनी सुमित लोंढे यांच्या विशेष प्रयत्नातून ड्रेनेज लाईनचे काम मार्गी लावण्यात आले आहे.

या परिसरात ड्रेनेज व्यवस्थेअभावी नागरिकांना पावसाळ्यात सांडपाणी साचणे, दुर्गंधी तसेच आरोग्याच्या समस्या अशा अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. नागरिकांनी केलेल्या मागणीनंतर नगरसेविका अश्विनी सुमित लोंढे यांनी सातत्याने पाठपुरावा करत हा प्रश्न प्रशासनाकडे मांडला. नागरिकांच्या मूलभूत सुविधांना प्राधान्य देत आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, त्यामुळे चिपाडे मळा व धनश्री कॉलनीतील ड्रेनेज लाईनचा प्रश्न आता कायमस्वरूपी सुटण्यास मदत होणार आहे.

प्रभागातील विकासकामांना गती देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असून, नागरिकांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देणे हेच ध्येय असल्याचे नगरसेविका अश्विनी सुमित लोंढे यांनी सांगितले. ड्रेनेज लाईनचे काम मार्गी लागल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत आमदार संग्राम जगताप व नगरसेविका अश्विनी सुमित लोंढे यांचे आभार मानले आहेत.

यावेळी मनोज कोतकर म्हणाले की, चिपाडे मळा व धनश्री कॉलनीचा अनेक वर्षांपासूनचा महत्त्वाचा प्रश्न आता सोडवण्यात आला आहे. नागरिकांच्या समस्या लक्षात घेऊन आम्ही सातत्याने पाठपुरावा करत आहोत. प्रभागातील विकासकामे ही एका दिवसात होणारी नसून, नियोजन करून टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येतील. आम्ही चारही नगरसेवक मिळून प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील आहोत.रस्ते, ड्रेनेज, पाणीपुरवठा व इतर मूलभूत सुविधांना प्राधान्य देऊन नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे.

यावेळी नगरसेवक मयूर बांगरे, जालिंदर कोतकर, सुमित लोंढे, अनिल मोहीम ,मनोहर डिसले, मधुकर चिपाडे, प्रसाद चिपाडे, विनोद चिपाडे, रोहित जोशी, सुरेश चिपाडे, विजय चिपाडे, वैभव चिपाडे, कुणाल चिपाडे, योगेश चिपाडे, केतन भंडारे, अनिता चिपाडे, लता चिपाडे, वैशाली चिपाडे, पूनम सूडके, आशा जमदाडे, लता भुसारे, सारिका चिपाडे, हर्षदा मगर, पूनम परदेशी, वैशाली चाटुफळे, मंगल वाव्हाळ, दिशा गुरव, मयुरी उपरे, श्वेता भंडारी, प्रतिभा जगदाळे, वनिता कुदळे आदी उपस्थित होते.

## श्री विशाल गणेश मंदिराच्यावतीने शिशु संगोपन संस्थेच्या सविता रमेश फिरोदिया प्रशालेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शिक्षण हेच एकमेव माध्यम आहे जे व्यक्तीला अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जाते. श्री विशाल गणेश मंदिर फक्त धार्मिक उपासना स्थळ न राहता, समाजासाठी कार्य करणारी एक संस्था म्हणून पुढे येत आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात आर्थिक अडचणी येऊ नयेत म्हणून आम्ही शालेय साहित्य वाटप उपक्रम हाती घेतले आहे. लहानपणी मिळालेली मदत ही त्यांच्या मनात कायमची ठसते आणि ते समाजप्रेम जोपासणारे नागरिक बनतात, याचा आम्हाला विश्वास आहे. पुढेही असे उपक्रम चालू ठेवण्याचा आमचा संकल्प असल्याचे प्रतिपादन देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी केले.

शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश देवस्थानच्या वतीने शिशु संगोपन संस्थेच्या सविता रमेश फिरोदिया प्रशालेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप म्हणून वह्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ऍड अभय आगरकर ,उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, विश्वस्त पांडुरंग नन्नवरे, चंद्रकांत फुलारी, माणिकराव विधाते, नितीन पुंड ,गणेश राऊत यांच्यासह संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा, व्हा. चेअरमन दशरथ खोसे, सहसचिव राजेश झालानी, एल के आव्हाड ,बन्सी नन्नवरे ,विनोद कटारिया , माध्य.मुख्याध्यापक दत्तात्रय कजबे, प्राथ.मुख्याध्यापिका योगिता गांधी उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना संस्थेचे अध्यक्ष दिलीप गुंदेचा म्हणाले कि शिशु संगोपन संस्था ही गेली अनेक वर्षे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असून, शिक्षण हा या कार्याचा केंद्रबिंदू आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाबरोबरच त्यांच्यासाठी आवश्यक असलेली मूलभूत साधनेही उपलब्ध करून देणे ही संस्थेची जबाबदारी आहे. या उपक्रमांतर्गत श्री विशाल गणेश देवस्थान ट्रस्टने पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप केल्याबद्दल आम्ही त्यांच्या आभारी आहोत. समाजातील अशा संस्थांच्या सहकार्यामुळेच गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणात स्थैर्य लाभते असे प्रतिपादन चेअरमन दिलीप गुंदेचा यांनी केले.

संस्थेचे व्हा.चेअरमन दशरथ खोसे म्हणाले की, आज मिळालेल्या या वह्या केवळ कागदाच्या स्वरूपात नसून त्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या भविष्यासाठी एक नवा आत्मविश्वास आणि प्रेरणा घेऊन आल्या आहेत. शिक्षणासाठी कोणतीही गोष्ट लहान नसते, आणि त्यामागे असलेली सद्भावना विद्यार्थ्यांच्या मनात खोलवर जाते. संस्थेच्या वतीने अशा उपक्रमांना सदैव पाठबळ दिले जाईल. विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्याच्या या कार्यात एकत्र येणं ही काळाची गरज असून, भविष्यात अशा सामाजिक भान असलेल्या उपक्रमांचे प्रमाण वाढावे, हीच अपेक्षा आहे.

## आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आता अत्याधुनिक गुडघा व खांदादुखी निवारण केंद्र

### तज्ज्ञ डॉ. इताशा मडके यांच्या अनुभवी मार्गदर्शनाचा रूग्णांना लाभ

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे आता गुडघेदुखी, खांदेदुखी आणि इतर सांधेदुखीने त्रस्त असलेल्या रुग्णांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज निवारण केंद्र सुरू झाले आहे. याठिकाणी तज्ज्ञ डॉ. इताशा मडके ( एमबीबीएस, एमडी, एफ.आय.पी.एम.) या पूर्णवेळ उपलब्ध आहेत. त्यांनी कोल्हापूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस केले आहे. पुण्यातील काशीबाई नवले महाविद्यालयातून त्यांनी एमडी ॲनेस्थेशिया ॲण्ड क्रिटिकल केअर अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. यानंतर त्यांनी मुंबईतील केईएम हॉस्पिटलमध्ये दीर्घकालीन वेदना उपचार शास्त्रात फेलोशिप प्राप्त केली आहे.

सोमवार ते शनिवार दुपारी १ ते २.३० यावेळेत आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे डॉ. मडके रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील. याठिकाणी अल्ट्रासाऊंड व सी- आर्म द्वारे अत्याधुनिक उपचार, डे केअर पद्धतीमुळे रूग्णालयात दाखल होण्याची गरज लागत नाही. गुडघेदुखी, सांधेदुखी, खांदा आखडणे म्हणजे आयुष्याची गती थांबली असे होत नाही. वयोमानानुसार गुडघ्याची गादी झिजणे, गुडघ्यातून आवाज येणे, जिना चढताना-उतरताना तीव्र कळ येणे, चालणे-उठणे-बसणे अवघड होणे, गुडघ्याच्या लिगामेंटला दुखापत या समस्यांवर शस्त्रक्रिया न करता उपचार शक्य आहे. अनेकदा रूग्णांना शस्त्रक्रिया नको असते, मधुमेह, हृदयरोग अशा आजारांमुळे गुडघ्यावर शस्त्रक्रिया करणे शक्य नसते. तसेच खांद्याच्या दीर्घकालीन समस्या, फ्रोजन शोल्डर, खांदा आखडणे, हात पाठीमागे न जाणे, हात वर उचलताना असह्य वेदना होणे, खांद्याच्या स्नायूवर सूज किंवा दुखापत, रात्री झोपताना खांद्यात असह्य वेदना होणे, इतर सांध्यांच्या वेदना, मनगट व कोपराच्या वेदना, टाचा दुखणे तसेच इतर दीर्घकालीन वेदनांवर प्रभावी उपचार व मार्गदर्शन याठिकाणी केले जाते.

# सुरेगाव येथे हजारोंचा किराणा माल डम्पिंग ग्राउंडवर कालबाह्य वस्तूंमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर



**दैनिक आकर्षण । विशाल लोंढे**

**कोपरगाव –** राज्यात सध्या अन्न व औषध प्रशासनाच्या धडक कारवायांमुळे अन्नपदार्थांची गुणवत्ता, कालबाह्य मालाची विक्री आणि ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या व्यावसायिकांवर मोठा दबाव निर्माण झाला आहे. अशातच कोपरगाव तालुक्यातील सुरेगाव येथे एक धक्कादायक आणि तितकीच गंभीर घटना समोर आली असून, हजारो रुपयांचा किराणा माल थेट डम्पिंग ग्राउंडवर फेकून देण्यात आल्याचे उघड झाले आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत चारचाकी वाहनातून मोठ्या प्रमाणात बॉक्समध्ये पॅक केलेला किराणा माल सुरेगाव येथील डम्पिंग ग्राउंडवर आणून टाकण्यात आला. सकाळी नागरिकांच्या हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर अनेकांनी घटनास्थळी धाव घेतली.

फेकून दिलेल्या मालाची पाहणी केली असता अनेक खाद्यपदार्थांवर उत्पादन तारीख, बॅच क्रमांक किंवा एक्सपायरी डेट नमूद नसल्याचे आढळून आले. तर अनेक वस्तू मुदतबाह्य झालेल्या असल्याचेही दिसून आले. त्यामुळे हा माल बाजारात विक्रीसाठी ठेवण्यात आला होता का, असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, डम्पिंग ग्राउंडवर टाकण्यात आलेला हा माल सुरुवातीला बॉक्समध्ये पॅक अवस्थेत होता. मात्र त्यानंतर तेथे कचरा व भंगार गोळा करणाऱ्या काही महिला पोहोचल्या आणि त्यांनी त्यातील अनेक वस्तू उचलून नेल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे परिस्थिती आणखी गंभीर बनली आहे.

कारण हा माल कालबाह्य अथवा निकृष्ट दर्जाचा असल्यास तो एखाद्या गरीब कुटुंबाच्या वापरात आला किंवा लहान मुलांनी तो खाल्ला, तर अन्न विषबाधा, गंभीर आजार किंवा इतर आरोग्यविषयक समस्या निर्माण होऊ शकतात. यामुळे मोठी जीवितहानी होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही.

विशेष म्हणजे, राज्यभर अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली भेसळयुक्त, कालबाह्य आणि नियमबाह्य अन्नपदार्थांविरोधात मोठ्या प्रमाणावर कारवाई सुरू आहे. अशा परिस्थितीत कारवाईच्या धास्तीने पुरावे नष्ट करण्यासाठीच हा माल डम्पिंग ग्राउंडवर टाकण्यात आला का, असा संशय व्यक्त केला जात आहे.

आता या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित माल कोणाचा आहे, तो कुठून आणण्यात आला आणि किती दिवसांपासून त्याची विक्री सुरू होती याचा तपास होणे आवश्यक आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी सुरेगावसह परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

### अहिल्यानगर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन आयोजित

# १७ वर्षा आतील ते १९ वर्षा आतील व खुल्या गटासाठी निवड चाचणी स्पर्धेचे उद्घाटन

**१६० खेळाडू १९३ सामने । निवड चाचणी स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धेत खेळण्याची संधी – राहुल मोटे**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मोठ्या उत्साहात बॅडमिंटन निवड चाचणी स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले आहे.या खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी असोसिएशनच्या वतीने नेहमीच वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात येतात.या स्पर्धे साठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे विशेष सहकार्य लाभत असते.

निवड चाचणी स्पर्धेत जिंकणाऱ्या मुलांसाठी अहमदनगर बॅडमिंटन असोसिएशनच्या वतीने जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.की जेणेकरून हे खेळाडू राज्यस्तरीय व राष्ट्रीय खेळामध्ये चमकतील.या निवड चाचणी स्पर्धेतील खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धे त खेळण्याची संधी मिळणार आहे.असे प्रतिपादन अहमदनगर डिस्ट्रिक्ट बॅडमिंटन असोसिएशनचे खजिनदार राहुल मोटे यांनी केले आहे.



वाडियापार्क क्रीडा संकुल येथे बॅडमिंटन हॉलमध्ये अहमदनगर डिस्टिक्ट बॅडमिंटन असोसिएशनच्या वतीने वयोगट १७ वर्षा आतील ते १९ वर्षा आतील व खुल्या गटासाठी निवड चाचणी स्पर्धा व वयोगट ११,१३,१५ यांच्या साठी जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा दि.१९ जून व २० जून या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.या बॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आले. याप्रसंगी अहमदनगर डिस्ट्रिक्ट बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव मिलिंद कुलकर्णी,खजिनदार राहुल मोटे,सदस्य डॉ.भूषण अनुभुले,चेतन बोगावत,राज्य क्रीडा प्रशिक्षक विशाल गर्जे,मुख्य पंच ऋषिकेश कुलकर्णी आदी उपस्थित होते.

या निवड चाचणी स्पर्धेसाठी २११ खेळाडूंनी प्रवेशिका नोंदणी केली आहे. तसेच १६० खेळाडूंचा सहभाग असल्याने दोन दिवसात १९३ सामने होतील अशी माहिती बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव मिलिंद कुलकर्णी यांनी दिली आहे.

यावेळी संभाजीनगर येथे झालेल्या बॅडमिंटन स्पर्धेत वयोगट १५ सिंगल्स मध्ये विधी सैनी हिने सुवर्णपदक पटकविल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.या स्पर्धेसाठी मुख्य प्रायोजक योनेक्स सनराईज आणि रायसोनी फाउंडेशनचे विशेष सहकार्य लाभत आहे.

# सैनिकांच्या कुटुंबांशी थेट संपर्कासाठी 'मिशन निरंतर मिलाप १.०'चा चौथा टप्पा सुरू



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** माजी सैनिक, वीरनारी तसेच शहीद जवानांच्या कुटुंबीयांच्या विविध समस्या आणि तक्रारींचे त्वरित निराकरण करण्याच्या उद्देशाने मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर अँड स्कूल (), अहिल्यानगर यांच्या वतीने 'मिशन निरंतर मिलाप १.० सेंट्रल ईस्ट झोन' या उपक्रमाच्या चौथ्या टप्प्याला प्रारंभ करण्यात आला. या मोहिमेच्या पथकाला १७ जून २०२६ रोजी मेजर जनरल आर. प्रेम राज (, ), अतिरिक्त महासंचालक मेकॅनाइज्ड इन्फंट्री यांच्या हस्ते हिरवा कंदील दाखवून रवाना करण्यात आले.

लेफ्टनंट जनरल पी. एस. शेखावत (, , ), चीफ ऑफ स्टाफ, मुख्यालय दक्षिण–पश्चिम कमांड व कर्नल ऑफ द रेजिमेंट यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. माजी सैनिक, वीरनारी आणि त्यांच्या कुटुंबीयांशी थेट संपर्क साधून त्यांच्या दारापर्यंत पोहोचत विविध प्रश्नांचे निराकरण करणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे.

यावेळी मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर अँड स्कूलचे मुख्य रेकॉर्ड अधिकारी लेफ्टनंट कर्नल अशोक कुमार यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, कनिष्ठ आयुक्त अधिकारी () आणि अन्य अधिकारी उपस्थित होते. मोहिमेच्या चौथ्या टप्प्यात दोन कनिष्ठ आयुक्त अधिकारी, चार बिगर आयुक्त अधिकारी तसेच मेकॅनाइज्ड इन्फंट्री रेजिमेंट आणि विविध बटालियनचे प्रतिनिधी सहभागी आहेत. हे पथक ओडिशा, पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड आणि छत्तीसगड या राज्यांतील १६ जिल्ह्यांचा दौरा करून सुमारे ४,१२५ माजी सैनिक, वीरनारी आणि शहीद जवानांच्या कुटुंबीयांशी प्रत्यक्ष संवाद साधणार आहे.

दौऱ्यादरम्यान पेन्शनविषयक लाभ, प्रणालीशी संबंधित अडचणी, विविध कल्याणकारी योजना तसेच इतर सेवाविषयक प्रश्नांबाबत मार्गदर्शन आणि तात्काळ मदत उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यामुळे लाभार्थ्यांच्या तक्रारींचे जलद निराकरण होण्यास मदत होणार आहे.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, या उपक्रमामुळे रेजिमेंट आणि माजी सैनिकांच्या कुटुंबीयांमधील भावनिक नाते अधिक दृढ होईल. तसेच सन्मान, आपुलकी आणि वेळेवर मदतीची भावना अधिक बळकट होईल.

'मिशन निरंतर मिलाप' हा केवळ प्रशासकीय उपक्रम नसून राष्ट्रसेवेसाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांप्रती कृतज्ञता, संवेदनशीलता आणि बांधिलकी व्यक्त करणारा मानवी दृष्टिकोन आहे. देशसेवकांच्या कुटुंबीयांसोबत रेजिमेंट कायम खंबीरपणे उभी आहे, हा संदेश या मोहिमेतून दिला जात आहे.

# दक्षिण आफ्रिकेतील कॉम्रेड मॅरेथॉन पूर्ण करुन शहरात परतलेल्या धावपटूंचा जल्लोषात स्वागत

**डॉ. अमित बडवे यांना प्लॅटिनम पदक; चार धावपटूंनी नगरच्या शिरपेचात रोवला मानाचा तुरा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दक्षिण आफ्रिकेत नुकत्याच पार पडलेल्या जगप्रसिद्ध आणि अत्यंत खडतर मानल्या जाणाऱ्या कॉम्रेड मॅरेथॉन २०२६ स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळवून परतलेल्या अहिल्यानगरच्या चार धावपटूंचे शहरात उत्साहपूर्ण वातावरणात भव्य स्वागत करण्यात आले. जागतिक स्तरावरील या प्रतिष्ठित स्पर्धेत दमदार कामगिरी करत शहराचे नाव आंतरराष्ट्रीय क्रीडा विश्वात उज्ज्वल करणाऱ्या धावपटूंवर नगरकरांनी अभिनंदनाचा वर्षाव केला.

दक्षिण आफ्रिकेतील डरबन ते पीटरमारित्झबर्ग या दोन शहरांदरम्यान पार पडलेल्या ८५.७७ किलोमीटरच्या कॉम्रेड अल्ट्रा मॅरेथॉनमध्ये अहिल्यानगरचे डॉ. अमित बडवे, जस्मित वधवा, सुनील बनकर आणि सचिन राणे यांनी यशस्वीरित्या स्पर्धा पूर्ण करून उल्लेखनीय कामगिरी नोंदविली. या धावपटूंना



मार्गदर्शन करणारे प्रशिक्षक संदीप जोशी यांचाही या यशात मोठा वाटा राहिला.

शहरात आगमन होताच धावपटूंचे ढोल–ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतषबाजीत आणि घोषणांच्या गजरात स्वागत करण्यात आले. नगर–पुणे महामार्गावरील अहमदनगर महाविद्यालयाजवळील श्रीदीप हॉस्पिटल येथे आयोजित स्वागत सोहळ्यात क्रीडाप्रेमी, धावपटू, सामाजिक कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. पारंपरिक पद्धतीने औक्षण करून धावपटूंवर पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी धावपटूंनीही ढोलाच्या तालावर ठेका धरत आनंद व्यक्त केला.

स्वागत सोहळ्यापूर्वी सर्व धावपटूंनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून आपल्या यशाचे श्रेय मातृभूमीला आणि शहरवासीयांच्या शुभेच्छांना अर्पण केले. अनेकांनी त्यांच्या गळ्यात पुष्पहार घालून सत्कार केला. आपल्या कुटुंबीयांशी गळाभेट घेताना अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले होते. हा क्षण उपस्थितांसाठी भावनिक आणि प्रेरणादायी ठरला.

कॉम्रेड मॅरेथॉन ही जगातील सर्वात जुनी आणि कठीण अल्ट्रा मॅरेथॉन स्पर्धांपैकी एक मानली जाते. पहिल्या महायुद्धात शहीद झालेल्या सैनिकांच्या स्मरणार्थ सुरू करण्यात आलेल्या या स्पर्धेचे यंदाचे ९९ वे वर्ष होते. प्रत्येक वर्षी हजारो धावपटू या स्पर्धेत सहभागी होतात. यंदा जगभरातील सुमारे २२ हजार धावपटूंनी सहभाग घेतला होता. भारतातून २५० हून अधिक धावपटूंनी स्पर्धेत भाग घेतला असून, त्यामध्ये अहिल्यानगरच्या चार धावपटूंनी केलेली कामगिरी विशेष कौतुकास्पद ठरली.

# खेलो मास्टर गेम्स २०२६ स्पर्धेत अर्चना काळे हिस तीन सुवर्णपदके

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नुकत्याच मुंबई येथे खेलो मास्टर्स गेम्स असोसिएशन ऑफ पालघर डिस्टिक यांनी राज्यस्तरीय अथलेटिक्स स्पर्धेचे आयोजन केले होते या स्पर्धा मरीन लाईन्स युनिव्हर्सिटी ग्राउंड येथे दिनांक १३ व १४ जून दरम्यान संपन्न झाल्या आहे.

खेलो मास्टर्स गेम्स असोसिएशन या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातील आंतरराष्ट्रीय महिला खेळाडू अर्चना रामभाऊ काळे यांनी अहील्यानगर जिल्हा संघाचे प्रतिनिधत्व करीत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत वर्चस्व स्थापित करून१०० मीटर धावणे ,१०० मीटर अडथळा शर्यत,व ४०० मीटर धावणे अशा तीन क्रीडा प्रकारात तीन सुवर्णपदक पटकावित जिल्हा पोलीस दलाचे नाव लौकिक केलेले आहे. अर्चना काळे हिने यापूर्वी अनेक राज्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धे त पदके पटकावून जिल्हा पोलीस दलाचे नाव लौकिक केलेले आहे. त्याचप्रमाणे पोलीस दलातील राष्ट्रीय खेळाडू अन्वर सय्यद या खेळाडूने सुद्धा १०० मीटर धावणे ११० मीटर अडथळा शर्यत व



ट्रिपल जंप या क्रीडा प्रकारात एक सुवर्ण व दोन कास्यपदक पटकाविली आहे.

त्याच्या कामगिरीमुळे सर्वत्र कौतुक होत असून अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधिक्षक मा.श्री मुमका सुदर्शन तसेच अप्पर पोलीस अधीक्षक श्री. वैभव कलबरमे तसेच मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेचे पोलीस निरीक्षक श्री किरण शिंदे ,राखीव पोलीस निरीक्षक श्री उमेश परदेशी यांनी खेळाडूंची अभिनंदन केले तसेच या खेळाडूना क्रीडा प्रशिक्षक सौ.आरती एकाडे यांचे मार्गदर्शन लाभले.

(पान १ वरून)

## ठाकरे शिवसेनेच्या गद्दार खासदारांनी आधी राजीनामे द्यावेत, मग शेण खावं

कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**उपमुख्यमंत्री शिंदेंवर टीकास्त्र :** हिंदुरुदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या जीवावर एकेकाळी रिक्षावाला असणाऱ्या एकनाथ शिंदेंनी सर्व काही मिळवलं. ज्या ताटात जेवले तिथेच घाण केली. विश्वासघात करत दिल्लीच्या पायी लोटांगण घातलं. पक्ष चोरला. आमदार चोरले. जनतेने ठाकरे शिवसेनेच्या खासदारांना पुन्हा मोठ्या मताधिक्यान निवडून दिलं. त्यांना सुद्धा आता यांनी लाच देऊन फोडलं. जनतेची तिजोरी, महाराष्ट्र लुटून शेकडो कोटींना खासदारांचा लिलाव त्यांनी घेतला. पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या पाठीत खंजीर खुपसला. महाराष्ट्र या गद्दारांना कधीही माफ करणार नाही, असे काळे यावेळी म्हणाले.

**फुटीर खासदारांवर राईट टू रिकॉल लागू करा :**

पक्षाच्या चिन्हावर निवडून आलेले आणि पक्ष, जनतेशी बेईमानी करून फुटीर भूमिका घेणारे खासदार जनादेशाचा अपमान करीत आहेत. अशा लोकप्रतिनिधींना जनतेसमोर पुन्हा उत्तरदायी करण्यासाठी ''राईट टू रिकॉल'' कायदा देशात तातडीने लागू करण्याची गरज आहे. मतदारांचा विश्वासघात करणाऱ्यांना पाच वर्षे पूर्ण होण्या आधीच जनतेला परत बोलावण्याचा अधिकार मिळायला हवा, अशी भूमिका यावेळी किरण काळे यांनी मांडली.

**डीलिमिटेशन विधेयक मंजुरीचा घाट :**

मागील संसदीय अधिवेशनामध्ये दोन तृतीयांश बहुमता अभावी डीलिमिटेशन विधेयक मंजुरी आणि त्या माध्यमातून देशाचे तुकडे पाडण्याचा सत्ताधाऱ्यांचा डाव फसला. सध्या देशावर ऊर्जा संकट आहे. तरुणाई – जेन झी बेरोजगारी, पेपर फुटी मुळे प्रचंड अस्वस्थ आहे. कॉकरोच जनता पार्टीला मिळणार समर्थन बोलक आहे. जनमत विरोधात असल्यामुळे काहीही करून २०२९ च्या निवडणुका जिंकण्या करिता आगामी अधिवेशनापूर्वी आधी तृणमूल काँग्रेस, मग ठाकरे शिवसेना पुन्हा त्यांनी फोडली. त्यांचा पुढचा निशाणा आता राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडे आहे, असा आरोप किरण काळेंनी केला. संविधान रक्षणासाठी आम्ही एकजुटीने संघर्ष करू, असे यावेळी ते म्हणाले.

## जबरी चोरी करून पसार झालेले आरोपी २४ तासांत जेरबंद

केल्याची कबुली दिली आहे. पोलिसांनी आरोपीकडून लुटलेल्या रकमेपैकी पंधराशे रुपये रोख जप्त केले आहेत. पुढील तपास पोसई प्रवीण पाटील करीत आहेत.

## भाऊसाहेब वाकचौरे यांचा पक्षप्रवेश; शिवसैनिकांचा जल्लोष

मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांचा शिवसेना (शिंदे गट) पक्षात झालेला अधिकृत प्रवेश. या पक्षप्रवेशाचे उपस्थित मान्यवरांनी आणि शिवसैनिकांनी जोरदार स्वागत केले. खासदार वाकचौरे यांच्या समावेशामुळे जिल्ह्यातील पक्षाची ताकद अधिक वाढली असून, शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.या जल्लोषनंतर मान्यवरांनी श्री साईबाबा मंदिरात जात बाबांचे दर्शन घेतले व यानंतर आमदार अमोल खताळ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले, तर जिल्हाप्रमुख कमलाकर कोते आणि नितीन औताडे यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधत आगामी वाटचालीसाठी प्रोत्साहित केले. यावेळी मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिवसेना प्रेमी नागरिक उपस्थित होते.

## विकासाची वाट खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचविणार –

यांचे स्वीय सहाय्यक संदीप चौधरी, राष्ट्रवादीचे नेते रवींद्र राजदेव उद्योजक दिनेश घोलप यांची प्रमुख उपस्थिती होती.

नांदूर पठार गावात शेतपाणंद रस्त्यांच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे २६ किलोमीटर रस्त्यांची कामे पूर्ण झाली असून त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीमाल वाहतूक, शेतीकामे आणि दळणवळणासाठी मोठा दिलासा मिळाला आहे. ग्रामीण भागातील विकासाला चालना देणाऱ्या या कामांमुळे गावाचा चेहरामोहराच बदलल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमादरम्यान विविध मान्यवरांनी ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी खासदार निलेश लंके यांनी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी आणि गावागावांत विकासकामे पोहोचविण्यासाठी अशा योजनांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. यावेळी रवींद्र राजदेव, सोनिया राजदेव, संदीप चौधरी, यांच्यासह कोरठण खंडोबा देवस्थान विश्वस्त चंद्रभान ठुबे, पोपट गुंड, निलेश लंके प्रतिष्ठान मुंबई अध्यक्ष दिनेश घोलप, शंकर चिकने, भानुदास आंग्रे, ॲड. सूर्यकांत वलवे, प्रकाश राजदेव, बाळासाहेब चौधरी, माधव आंग्रे, दत्तात्रय चौधरी, जयराम चौधरी, शिवप्रसाद दिवेकर, शशिकांत आंग्रे, रमेश घोलप, शंकर आंग्रे, बबन घोलप, राजाराम राजदेव, योगेश राजदेव, मुरलीधर राजदेव, बाळासाहेब भांबरे, निलेश शिंदे, रंगनाथ आहेर, रंगनाथ राजदेव, सुरेश राजदेव, सुदाम वलवे, बाळासाहेब घोलप, रवींद्र चौधरी, रोहिदास गायकवाड, गणेश राजदेव, तुळशीराम आंग्रे, रवींद्र घोलप, योगेश जाधव, कैलास राजदेव, मारुती आंग्रे, संदेश आंग्रे, गणेश देशमाने, भागाजी पानसरे, सुयोग चौधरी, दत्ता चौधरी, बाळासाहेब पानसरे, ताराबाई राजदेव, छाया पानसरे, भरती चौधरी, रोहिणी चौधरी, कचराबाई पानसरे, चंद्रभान राजदेव आणि बदामबाई राजदेव यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नांदूर पठारच्या सर्वांगीण विकासासाठी खासदार निलेश लंके यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध झाला आहे. शेतपाणंद रस्त्यांमुळे शेतकऱ्यांना वर्षानुवर्षे भेडसावणाऱ्या अडचणी दूर होत आहेत. गावातील प्रत्येक वस्ती, शेतकरी आणि नागरिकांच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध असून आगामी काळातही विविध विकासकामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरू राहतील.

रवींद्र राजदेव

नेते, टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गट

## महात्मा फुले चौकात स्व. अरुण काका जगताप यांच्या २० फुटी भव्य प्रतिमेचे अनावरण

सोडविण्याचे काम केले. नगर शहरावरील त्यांचे प्रेम कधीही कमी झाले नाही.स्वतः व्यसनांपासून दूर राहून त्यांनी युवकांना व्यसनमुक्त जीवनाचा संदेश दिला. ''काका हे एक परीस होते,'' त्यांच्या सहवासात आलेल्या अनेकांचे जीवन सकारात्मक दिशेने बदलले. त्यांच्या विचारांमुळे आम्ही वाईट प्रवृत्तींपासून दूर राहिलो. कार्यकर्त्यांवर प्रेम करणारे आणि अडचणीच्या काळात धावून जाणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. आज ते आपल्यात नसले तरी त्यांचे विचार आणि कार्य आपल्यामध्ये जिवंत आहेत. ते समतावादी विचारांचे नेते होते. सर्व पक्षांतील नेत्यांशी त्यांचे स्नेहाचे संबंध होते. शहरात त्यांचा आदरयुक्त दरारा होता. त्यांनी माणसे पदाने नव्हे तर मनाने कमावली होती, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले म्हणाले की, आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून सारसनगर येथे उभारण्यात आलेल्या भव्य स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सला स्वर्गीय माजी आमदार अरुण काका जगताप यांचे नाव देण्याची मागणी करण्यात येणार आहे. या क्रीडा संकुलातून भविष्यात उत्कृष्ट खेळाडू घडतील. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या असून हे क्रीडा संकुल शहराच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावेल.

उद्योजक राजेंद्र चोपडा म्हणाले की, अहिल्यानगर शहरातील आनंद ऋषी हॉस्पिटल उभारण्यात स्वर्गीय अरुण काका जगताप यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळेच हे रुग्णालय उभे राहिले असून आज हजारो गोरगरीब नागरिकांना येथे दर्जेदार आरोग्य सेवा मिळत आहे. समाजहितासाठी त्यांनी केलेले कार्य सदैव स्मरणात राहील.तर नगरसेवक प्रकाश भागानगरे यांनी सांगितले की, महात्मा फुले चौकात उभारण्यात आलेली काकांची २० फुटी भव्य प्रतिमा ही केवळ स्मारक नसून त्यांच्या विचारांचे प्रेरणास्थान आहे. या प्रतिमेमुळे भावी पिढ्यांना त्यांच्या कार्याची आणि समाजसेवेची प्रेरणा मिळत राहील.